
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | JULY - 2023

# मुस्लिम मराठी साहित्याचे वेगळेपण

डॉ. वसंत गायकवाड
सी.जे.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान जिल्हा— गोदिंया,(महाराष्ट्र)



मुस्लिम मराठी साहीत्य हे मुस्लिमांच्या सामाजिक—सांस्कृतिक जीवनाचे दर्शन आहे.या साहित्यप्रवाहाने मुस्लिमांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्वाचे कार्य केले. आपापल्या परीने मुस्लिम साहित्यिकांनी जीवनात निर्माण होणाऱ्या सामाजिक,आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक समस्यांचे बहुआयामी चित्र साहित्यातून उभे केले. यातून मुस्लिम समाज जसा उभा झाला तसाच या समाजाचे आजपर्यंत प्रकट न झालेले नवे वास्तवही वाचकांसमोर उभे झाले. हे वास्तव समाजजीवन शब्दबध्द करण्यासाठी मुस्लिम लेखकांनी प्रामुख्याने कथा, कविता,कादंबरी,नाटक, वैचारिक निबंध,समीक्षा आणि आत्मचरित्र अशा विविध वाङमयप्रकारांचा आधार घेतला.लेखनाची परंपरा नसलेल्या या सामान्य माणसांनीच सिध्दहस्त लेखकांप्रमाणे ताकदीने हे वाङमयप्रकार हाताळले आणि त्यातून मुस्लिम समाजाच्या व्यथा—वेदना समाजासमोर मांडल्या . हाच मुस्लिम मराठी साहित्याचा आधुनिक प्रवाह होय.

मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर कालखंडात निर्माण झालेल्या नव्या प्रवाहांमध्ये मुस्लिम मराठी साहित्य हा एक वेगळा आणि अर्थपूर्ण प्रवाह आहे. ग्रामीण,स्त्रीवादी,जनवादी,दलित आणि आदीवासी या साहित्यप्रवाहांची तपासणी केल्यास मुस्लिम मराठी साहित्यप्रवाहाचे वेगळेपण निश्चितपणे जाणवते. हे साहित्यप्रवाह ज्याप्रमाणे आपली वेगळी अस्मिता आणि जाणीव साहित्यातून अधोरेखित करतात त्याचप्रमाणे मुस्लिम मराठी साहित्यही आपले अस्तित्व आणि वेगळेपण स्पष्ट करतांना दिसते.

मुस्लिम धर्म जरी परकीय असला तरी महाराष्ट्रातील मुसलमान परकीय नाही.तो याच मातीत जन्मलेला आहे. महाराष्ट्रातील बहुतांश मुस्लिम धर्मांतरित आहेत. त्यांचे पूर्वज भारतीय होते. त्यांचे सांस्कृतिक योगदान नाकारता येत नाही. राट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत तो सहभागी होता.

ग्रामीण महाराष्ट्रातील नव्वद टक्के मुसलमान आजही दारिद्रयरेषेखाली जगत आहे. विकासाच्या शक्यता त्याच्यासाठी नाकारण्यात आल्या.तो शिक्षित नाही. तो जातीच्यवस्था माननारा आहे.तो अंधश्रध्दाहूही आहे.असे असले तरी तो भारतीय आहे.या पार्श्वभूमीवर त्याच्या भारतीय असण्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले जातात.त्याच्या राष्ट्रनिष्ठेवरच शंका उपस्थित केल्या जातात.' मुसलमान माजलेत 'असे त्याच्याबद्दल सर्रास बोलले जाते.ही विधाने त्याच्या अस्तित्वालाच आव्हान देतात. म्हणूनच आपलं अस्तित्व स्पष्ट करण्यासाठी,आपली राष्टनिष्ठा प्रखरपणे मांडण्यासाठी आणि अस्तित्वाच्या संदर्भात निर्माण झालेल्या या जीवघेण्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी 'मुस्लिम मराठी साहित्य 'मुस्लिम माणसाला व्यासपीठ उपलब्ध करून देते. मुस्लिम अस्तित्वाचा हा शोध इतर साहित्यप्रवाहांपेक्षा वेगळा आणि अर्थपूर्ण आहे.

भारताची फाळणी हा भारतातील हिंदू—मुस्लिम समाजातील राजकीय नेत्यांचा निर्णय होता.ती एक राजकीय घटना होती. फाळणीने भारतीय मुस्लिमांना विभागून टाकले.मुस्लिम समाजातला अभिजनवर्ग

पाकिस्तानात गेला आणि पाकिस्तानी मुस्लिम झाला. तर भारतात. इथल्या मातीशी ज्याची मुळे घट्ट होती तो मुसलमान इथेच राहिला आणि भारतीय मुसलमान झाला.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात फाळणी ही केवळ ऐतिहासिक घटना राहिली नाही. या घटनेचे भारतीय समाजावर गंभीर परिणाम झाले. यामुळे हिंदूच्या मनात मुस्लिमांच्या विषयी अढी विर्माण झाली.''भारतात एकही मुसलमान राहू नये,राहिला तर त्यालाही पाकिस्तानात पाठवावे. तुम्हालाच पाकिस्तान हे नवीन राष्ट्र म्हणून हवे होते ना ? मग तिथंच जा ! अशी हिंदुंची मानसिकता बनली.''[1] भारत–पाक विभाजनाला केवळ मुस्लिम कारणीभूत आहेत असं समजल्या जाते. या भूमिकेवरून मुस्लिमेत्तर मुस्लिमांशी व्यवहार करीत असतात. एकंदरीत फाळणी ही राज्यकर्त्यांनी सामान्य हिंदु – मुस्लिम समाजावर लादलेली राजकीय घटना होती. केवळ राजकीय महत्वाकांक्षेमुळे हिंदु – मुस्लिम सहजीवनाला तिलांजली देण्यात आली. परंतु आज फाळणीचा हाच वेदनामय भूतकाळ वारंवार उकरून काढून मुसलमानांवर दोषारोपण करण्यात येते. या भूतकाळातून बाहेर पडून आजचे वर्तमान सुधारले पाहिजे  सामान्य माणसांचे वर्तमान वास्तवातील गंभीर प्रश्न सुटले पाहिजेत. ऐकमेकांच्या मनात निर्माण झालेल्या शंका निवळल्या पाहिजेत. हिंदु – मुस्लिम सहजीवनाचे नवे पर्व सुरू झाले पाहिजे. याची खबरदारी मुस्लिम साहित्यप्रवाहाला घ्यावी लागेल. फाळणीच्या भूतातून मुक्त होणे हे महत्वाचे सुत्र मानले तर हेच सुत्र मुस्लिम साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करते.

मुस्लिम हे हिंसक आणि दहशतवादी आहेतः असा गैरसमज पसरविण्यात येतो . 26/11 ला झालेला मुंबईवरील दहशतवादी हल्ला,जयपूर,बंगलोर,दिल्ली हैदराबाद,अहमदाबाद या शहरांमध्ये झालेले साखळी बॉम्बस्फोट यासारख्या घटनांनी भारतीय जनतेसमोर आलेले अर्निबंध दहशतवादाचे गंभीर परिणाम. यातील बहूतांश घटनांमध्ये मुस्लिम समाजातील तरूणांचा सहभाग होता. हेही स्पष्ट झालेले आहे.1992 ला झालेल्या बाबरी मशीदीच्या विध्वंसानंतर  'सीमी ' ही संघटना अधिक जहाल झाली. गुजरातमध्ये दंगली उसळल्या . देशातील अनेक ठीकाणी झालेल्या दहशतवादी कारवायात मुस्लिम तरूण सहभागी असल्याचा निष्कर्ष भारतीय सुरक्षातज्ञांनी दिला. कदाचित यामुळेच मुस्लिम हे हिंसक आणि दहशतवादी आहेत असा समज गैरमुस्लिम समाजाच्या मनात निर्माण झाला.जरा गंभीर विचार केल्यास या सर्व दहशतवादी घटनांसाठी एकुणच मुस्लिम समाजाला जबाबदार ठरविणे अन्यायकारक आहे. या घटनांमध्ये मुस्लिम समाजातील काही तरूणांचा सहभाग होता ; संबंध मुस्लिम समाजाचा नाही. हे लक्षात घेणे आवश्यक आहे. दहशतवादाचे उगमस्थान माणसांच्या मनात रूतलेले असते. मनातील भीती,असुरक्षेची भावना,असहिष्णुता,बाहय सामाजिक संस्कार यात दहशतवादाची बिजे रूजलेली असतात. समाजातील द्वैष पसरविणारी माणसे द्वैषाचा व्यापारच करीत असतात. '' आमच्या धर्मश्रध्दांवर विश्चास ठेवणारे आम्ही सोडून सारे अमंगळ,कुरूप आहेत. आमच्या अस्तित्वाला आणि उन्नतीला ते बाधक आहेत. फक्त आम्हीच तेवढे खरे आहोत, आमच्या श्रध्दा चिरंतन आहेत. आमचा धर्म सत्य–सनातन असा आहे.''[2] अशी विचारसरणी द्वैष पसरविणारी माणसे पेरत असतात. यातून तरूणांचे मानसिक परिवर्तन केले जाते. शेवटी टोकाच्या दहशतवादाचा इथेच जन्म होत असतो. हे केवळ मुस्लिम धर्मातच नाही तर इतरही धर्मात आपणास पाहावयास मिळते. बाबरीचा विध्वंस,मालेगावचा बॉम्बस्फोट,समझोता एक्सप्रेस बॉम्बस्फोट, श्रीलंकेतील दहशतवाद, भारतातील पूर्वोत्तर राज्यांमधील दहशतवादी घटना,ब्रम्हदेशातील दहशतवाद या सर्वाचा गंभीर विचार केल्यास सत्य आपल्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही.'' कोणताही धर्म किंवा सामाजिक संप्रदाय दहशतवादाला कवटाळू शकत नाही. दहशतवाही हे नेहमी संख्येने कमी असतात. दहशतवादाला कोणत्याही जातीशी,वंशाशी वा धर्माशी जोडले जाऊ शकत नाही.''[3] ही वास्तविकता आहे.या दहशतवादी वातावरणाची झळ मुस्लिम समाजालाच अधिक भोगावी लागलेली आहे.दंगलित मुस्लिम माणसांच्याच मृत्यूंचे प्रमाण अधिक आहे.याची माहिती सर्वसामान्य माणसाला नसते. त्याचा या घटनांशी संबधही नसतो. त्यामुळे गैरसमज वाढत जातात आणि मुस्लिमद्वैष पसरत जातो. सर्वसामान्य नागरिकास मग तो कोणत्याही धर्माचा असो, त्याला आनंदाने जीवन जगण्यासाठी द्वैष आणि अविश्वास या बाबी उपयोगाच्या नाहीत. मुस्लिम मराठी साहित्याचा प्रवाह असा मुस्लिमद्वैष आणि अविश्वास या विरोधात विचार साहित्यातून प्रकट करते. इथेच हा प्रवाह इतर साहित्य प्रवाहांपेक्षा वेगळा ठरतो.

महाराष्ट्रातील मुस्लिम समाज हा इथल्या समाजाचाच एक अविभाज्य घटक आहे. तरीही मुस्लिमांना उर्दू भाषेशीवाय इतर भाषा बोलता येत नाही असे समजले जाते.मुस्लिम मराठी साहित्य भूमिकेचा निषेध करते आणि स्पष्ट करते की,मराठी ही अमुची मायबोली आहे.आम्ही आमची भाषिक,साहित्यिक,सांस्कृतिक आणि वैचारिक अभिव्यक्ती मराठी भाषेतच करतो.मराठी आमची मातृभाषा आहे.लाखो मुसलमान आज मराठी भाषा बोलतात.

महाराष्ट्राच्या बोलीभाषेतून आपला व्यवहार करतात. शेकडो मुस्लिम लेखक मराठीत लेखन करतात तरीही मुस्लिमांना उर्दूशीवाय दुसरी भाषा येत नाही. असा भ्रम जेव्हा सोयीस्कर पसरविण्यात येतो तेव्हा या मातीशी मुस्लिमांचे असलेले अस्तित्वाचे नातेच नाकारण्याचा प्रयत्न होतो. मुस्लिम मराठी लेखकांनी मराठीत लेखन करून आपले मराठी मातीशी असलेले नाते आणि अस्तित्व स्पष्ट केले आहे. मुस्लिमांना 'उपरा' ठरविणाऱ्या प्रवृत्तीला सडेतोड उत्तर दिलेलं आहे. याचं समर्थन करण्यासाठी मराठीत लेखन करणाऱ्या संतकविंची परंपराही त्याने मराठी वाचकांसमोर स्पष्ट केली आहे.

मुस्लिम मराठी साहित्याची निर्मितीपरंपरा चौदाव्या शतकापर्यंत स्पष्ट करतांना मुस्लिम मराठी लेखक आपले अस्तित्व मराठी मातीशी किती घट्टपणे जोडले गेले आह हेच स्पष्ट करतो. केवळ मुस्लिम मराठी लेखकांनाच त्यांचे मराठी मातीशी असलेले नाते उलगडून सांगावे लागते हा दैवदुर्विलास आहे. परंतु हेच त्याचे इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत अधिक स्पष्टपणे अधोरेखित होणारे वेगळेपण आहे.

कुठलाही धर्म एक जीवनपध्दती आहे ; सामाजिक जीवननिष्ठा आहे. धर्म व्यक्तिच्या विचारवर्तनाला दिशा देत असतो. कदाचित धर्म म्हणूनच आजपर्यंत अस्तित्वात आहे.स्वातंत्र्यानंतर आपण भारतीय संविधानाचा अंगिकार केल्यानंतर एक गोष्ट निर्विवादपणे आपणास मान्य करावी लागते की भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे. भारतात धर्म हा व्यक्तिगत आचरणाचा आणि कौटुबिक आस्थेचा विषय होऊ शकतो.भारतीय संविधान हे नागरिकांच्या सार्वत्रिक,सामूहिक आणि राष्ट्रीय जीवनाला आधार आणि दिशा देत असते. भारतीय मुस्लिमांनी इस्लाम आणि भारतीय संविधान या दोहोंचा स्वीकार केला आहे. भारतीय मुसलमान हे अंतीमतः भारतीय आहेत. हेच पायाभूत तत्व मुस्लिम मराठी साहित्याचे वैचारिक अधिष्ठान मजबूत करते.

शेकडो वर्षांपासून आपण या मातीशी इमान राखून आहोत. आपल्या अनेक पिढ्या या मातीत जन्माला आल्या आणि नष्ट झाल्या. अनेक वर्षे आम्ही इथल्या समाजाशी स्नेहपूर्ण व्यवहार केला. आमच्या धर्मातील संतांनी या समाजाला सर्वधर्म समभावाची शिकवण दिली. सामाजिक सौहार्द टिकविण्यासाठी जीवाचे रान केले. स्वातंत्र्याच्या चळवळीतही आम्ही सामील झालो. त्यासाठी प्रसंगी बलिदानही स्वीकारले. तरीही हा समाज, ही माती आपल्याला गद्दार ठरवीत आहे. हा आपलाच समाज मला 'लांड्या' म्हणून हिणवत आहे. या समाजातील माणसेच आज माझ्याकडे साशंक नजरेने बघत आहेत. हीच मुस्लिम मराठी साहित्यिकांची वेदना आहे. ही वेदना साहित्यरूप धारण करताना दिसते. मुस्लिम म्हणून जगत असताना येणारे हे उपरेपणाचे जीवन, त्याचे भोगावे लागणारे दाहक चटके आणि त्यातून शेवटी रक्तबंबाळ झालेल्या मुस्लिम मनाचे दर्शनच मुस्लिम मराठी साहित्य अभिव्यक्त करते. ही जाणीवच मुस्लिम मराठी साहित्याचा केंद्रबिंदू आहे.

मुसलमान शासकांनी इथल्या धर्मांतरित स्थानिक मुसलमानांना कधीच जवळ केलं नाही. हा स्थानिक मुसलमान समाज वांशिकदृष्ट्या इथलाच होता. मुसलमान समाजानेही या सामान्य मुसलमानास उपरा ठरविला. या समाजातील नबाब, जमीनदार आणि अभिजनवर्गीय मुसलमानांनी आपल्या स्वार्थी राजकारणासाठी सामान्य मुस्लिम समाजाला वेठीस धरले. त्यांच्यासाठी उर्दू भाषा राजकारणाचा विषय झाली. सामान्य मुस्लिमांना या प्रश्नाशी काहीच देणं–घेणं नव्हतं. ''खेड्यात राहणाऱ्या मुस्लिम समाजाचे प्रश्न गोशा पद्धती, तलाक, पोटगी, बहुपत्नीत्व हे कधीच ज्वलंत स्वरूपाचे नव्हते आणि आजही नाहीत.''[4] ही वस्तुस्थिती आहे. हेच प्रश्न आज माध्यमांद्वारे रंगविले जातात. एका बाजूला मुस्लिम अभिजनवर्गाने बहिष्कृत केलेला आणि दुसऱ्या बाजूने इतर समाजाने उपरा ठरविलेल्या सामान्य मुस्लिम समाजाची भयंकर कोंडी झाली. स्वातंत्र्याच्या अमृतकाळातही ही कोंडी फुटत नाही. घटनेनी दिलेल्या मानवी अधिकाराच्या चौकटीत सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगता येत नाही. ही सामान्य मुस्लिम मनाची व्यथा आहे. ही व्यथा मुस्लिम मराठी साहित्याच्या पानोपानी नमूद आहे.

चौदाव्या–पंधराव्या शतकापासूनच मुस्लिम मराठी संतकवींनी मराठीत लेखन केलेलं आहे. यात शाह मुर्तजा कादरी, शेख महंमद, शेख सलीम शाह, आलम, शेख सुलतान यासारख एकूण बेचाळीस मराठी मुस्लिम संतकवी होऊन गेलेले आहेत. या संतांचे कार्य प्रतिक्रियावादी कधीच नव्हते. एकेश्वरवादी तत्त्वज्ञानाच्या आधारे त्यांनी सामाजिक सौहार्द टिकविण्यासाठी मौलिक योगदान दिले. असा समृद्ध वारसा ज्या समाजाला आहे, त्या समाजाची व्यक्ती मराठी बोलू लागली, लिहू लागली की, 'मुसलमानांना कुठे मराठी बोलता येते?' यासारखे फालतू प्रश्न उपस्थित केले जातात. त्या समाजाचे साहित्यातून चित्रण करताना त्याला खलनायक, हिंसक, दुसऱ्यांच्या बायका पळवून नेणारा, मारामारीसाठी सदैव तयार असणारा असा नकारात्मक करण्यात येतो. ही पीडा आजच्या संवेदनशील तरुण साहित्यिकांची आहे. मुस्लिम मराठी साहित्य या पीडेलाच शब्दरूप देत असते.

ग्रमीण मुस्लिम समाज आजही कमालीचे अभावग्रस्त जीवन जगत आहे. या मुस्लिम समाजात जातीयता आहे. अंधश्रद्धा आहे. त्यांच्यातही हुंडापद्धती आहे. तो सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या खूपच मागासलेला आहे. बेकारीचे चटके त्यालाही जाणवत आहे. रोजी–रोटीचा प्रश्न त्याच्यासमोर आवासून उभा आहे. गरिबी, अज्ञान, दारिद्र्य त्याच्या जीवनात ठाण मांडून बसलेले आहेत. सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक विकास यासारख्या प्रश्नांवरच्या चर्चा त्याच्या आवाक्याबाहेरच्या आहेत. प्रबोधनाचे वारे अजूनपर्यंत त्याच्याजवळ पोहचलेच नाहीत. अजूनही तो जीवनातील सर्व प्रश्नांची उत्तरे भक्तीत शोधताना दिसतो. स्वातंत्र्याच्या अमृत वर्षांतही त्याच्या जीवनात परिवर्तनाची पहाट उगवलीच नाही. विकासाचा रस्ता त्याच्या दारापर्यंत गेलाच नाही, हे असे का झाले? यातून आपली सुटका कशी होईल? या प्रश्नांनी आजचे मुस्लिम मन व्यथित आहे. हाच त्याच्या वेदनेचा मूलस्रोत आहे. ही वेदना तो पोटतिडकीने साहित्यातून मांडतो आहे.

## संदर्भ टिपा

1) शहाजिंदे फ.म.तांबोळी फारुख (संपा.)''मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप'', पृ. 152
2) काळे अक्षयकुमार (संपा.) ''सांप्रदायिक सद्भाव आणि सामाजिक शांतता'' (कुलगुरू डॉ. श. नु. पठाण गौरवग्रंथ), ग्लोबल हेल्थ केअर ॲण्ड एज्युकेशन फाऊंडेशन पुणे, प्रथमावृत्ती, 2011 पृ. 217
3) तत्रैव पृ. 221
4) शहाजिंदे फ.म.''अनुभव'', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1997 पृ. 35